# ‘बेजबाबदार’ नागरिकाचं अनावृत पत्र

उच्च न्यायालयात गेल्यापासून मी मतदारयाद्यांसंबंधातल्या केसविषयी वाच्यता केली नव्हती. त्यामुळे शासनाकडून केल्या जाणा-या एकतर्फी propagandaलाच दुर्दैवाने प्रसिध्दी दिली जात आहे. अर्थात ‘सेलिब्रिटी’ चेहरा असला की अशा ‘रसदार आणि त्या व्यक्तीविरूध्द’ बातम्या होणं अटळ असतंच. त्यापलीकडे जाऊन कोर्टात जाण्यामागची माझी भूमिका थोडक्यात सांगण्याचा हा प्रयत्न -

पुण्यात किंवा मुंबईत उघड झालेले मतदारयादीतले अयोग्य व अन्याय्य फेरफार हे राजकीय पक्षांनी केलेलं गुन्हेगारी षड्यंत्र आहे, अशा वदंतांवर विश्वास न ठेवता असे फेरफार एवढया प्रमाणात कां व्हावेत याचा मागोवा घेण्याचा मी प्रयत्न केला.त्यासंबंधित कागदपत्रं मिळवली. खोलात गेल्यानंतर, मतदारयाद्या तयार केल्या जात असताना होत असलेला निष्काळजीपणा, कायद्यातल्या तरतुदींचं झालेलं उल्लंघन आणि त्याविषयी मतदारांचं अज्ञान तसंच अनास्था ह्या सगळयाची व्यापकता लक्षात आली. पुण्यासारख्या प्रगल्भ शहरात जर हे घडू शकतं तर कायदा व सुव्यवस्था धाब्यावर बसवलेल्या राज्यांमध्ये काय परिस्थिती असेल या प्रश्नाने मला अस्वस्थ केलं. भारतातल्या लोकशाहीवर दुर्दम्य विश्वास आणि आदर असलेला सजग नागरिक म्हणून, अश्रध्दपणे व्यवस्थेवर झोड उठवण्यापेक्षा मर्यादित पध्दतीने काही बदल घडवण्याच्या हेतूने न्यायालयाचा मार्ग स्वीकारला.

निवडणूक आयोग आणि निवडणूकीची प्रक्रिया या संदर्भातल्या कायद्यांना लाभलेलं अत्युच्च स्थान अबाधित राखण्यासाठी नागरिकांचा मताधिकार ‘मूलभूत हक्कां’मधून वगळयात आला. १९५० आणि १९६० साली केलेल्या कायद्यांनंतर, राजकारणात आणि समाजकारणात घडलेल्या बदलांनुसार हे कायदे मात्र त्या वेगाने बदलले नाहीत. त्याचं एक कारण म्हणजे नागरिकांसाठी, निवडणूक प्रक्रिया आणि आयोग यांच्याविरूध्द दाद मागण्याला कायद्यानेच प्रतिबंध केला आहे. ह्याचा फायदा राजकीय पक्षांनी मात्र वारंवार करून घेतल्याची उदाहरणं आहेत.झोपडपट्टयांमधले मतदार, बांधकामावरचे फिरते कामगार यांचा आजवर मोठया प्रमाणावर गैरवापर केला गेला आहे हे बहुतेकांना माहीत असेलच. “मतदारयादीतून लाखांच्या संख्येत वगळलेल्या मतदारांना कोणतीही नोटीस न देता व त्यानंतरच्या चौकशीला उत्तर देण्याची संधी न देण्याची मोठी चूक झाली आहे” असं आयोगाचे सहआयुक्त श्री.ब्रम्हा यांनी दिल्लीत आणि मुंबई उच्च न्यायालयात ॲडव्होकेट जनरल खंबाटा यांनीही मान्य केलं आहे. परंतु निवडणूक प्रक्रियेला खीळ बसू नये म्हणून आयोगाच्या चुकांविरूध्द, अन्याय होऊनही नागरिक काहीच करू शकणार नाहीत,

अशी तरतूद कायद्यातच आहे. अशा तरतुदी बदलण्याच्या दिशेने जाण्यासाठी आम्हाला कोर्टाची वाट धरावी लागली.

एक उदाहरण देतो : एखादी व्यक्ती/कुटुंब 'मतदारसंघा'तून स्थलांतरीत झालं असेल तरच 'त्या व्यक्तीने/कुटुंबाने सर्वसाधारण रहिवासाचे घर सोडले असे समजावे' असा नियम आहे. परंतु मतदार याद्यांची सुधारलेली आवृत्ती बनवण्यासाठी आलेल्या अधिका-याने घराला कुलूप आढळल्यास वा एका पत्त्यावर न सापडलेल्या मंडळींना सरसकट यादीतून काढण्याची कृती केली. जर प्रशासनाच्या सोयीसाठी 'विशिष्ट पत्त्यावर वास्तव्य नसणे' हा निकष लावायचा असेल, तर प्रचलित नियम बदलणं गरजेचं आहे. नाहीतर मतदारसंघ बदलला नसल्यास 'मतदार स्थलांतरीत आहे' अशा निष्कर्षापोटी त्याचं नाव वगळणं नियमबाह्य आहे. असे अनेक नियम आणि अधिका-यांच्या अन्याय्य कृतींमधलं अंतर कमी करण्याची नितांत गरज आहे.

निवडणूक प्रक्रिया खंडीत न होता वंचित मतदारांना मतदानाची संधी मिळावी यासाठी खालील तीन शक्यता कोर्टापुढे मांडल्या गेल्या.

१. पुणे ३४ लोकसभा मतदारसंघात देशातील मतदानाची प्रक्रिया संपण्यापूर्वी supplemental poll शक्य तितक्या लवकर घेण्यात यावा.मतदार यादीतून ज्या व्यक्तींची नावे अन्याय्य रीतीने वगळली गेली आहेत अशांच्या वास्तव्याचा योग्य पुरावा तपासून त्यांना मतदान करू द्यावे.यासाठी वगळलेल्या नावांची यादी अधिकृत (valid) यादी म्हणून मानावी.
२. वरील प्रमाणे मतदान घ्यावे परंतु त्याची मतमोजणी स्थगित ठेवावी. जर प्रथम व व्दितीय क्रमांकावरील उमेदवारांच्या मिळालेल्या मतांमध्ये, २,७१,६६२ पेक्षा कमी फरक असल्यास वरील मतांची मोजणी उपयोगात आणावी. २,७१,६६२ नावे वगळली असे प्रशासनाने मान्य केल्याने तो आकडा प्रमाणित धरावा असेही सुचवले.
३. सर्व मतमोजणी आयोगाच्या नियोजित आखणीनुसार पार पडल्यानंतर प्रथम व व्दितीय क्रमांकावरील उमेदवारांच्या मतांमध्ये २७१६६२ पेक्षा कमी फरक असल्यास निकाल राखून ठेवावा. नंतर त्वरीत वरीलप्रमाणे यादीतून वगळलेल्या व्यक्तींसाठी supplemental poll घ्यावा आणि ही मते लक्षात घेऊन मगच त्या मतदारसंघाचा निकाल घोषित करावा.

सध्या ज्या खंडपीठावर निर्णय देण्याची जबाबदारी आहे, ते न्यायाधीश अत्यंत समंजस, प्रगल्भ आणि सामाजिक बांधीलकी मानणारे आहेत. तरीही या निवडणूक प्रक्रियेच्या अभेद्य कायद्यांमध्ये मूलभूत बदल घडवणारा कोणताही निर्णय दिला जाणार नाही; वगळल्या गेलेल्या मतदारांना मतदानाची संधी दिली जाणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. न्यायालयाने दिलेला कोणताही निर्णय आपल्याला मान्य करावाच लागेल. पण तो न्याय्य असेलच असं नाही हे वास्तवही मान्य केलं पाहिजे.

या निमित्ताने एका महत्वाच्या उणीवेची जाणीव झाली - नागरिकाचे हक्क आणि स्वातंत्र्य अबाधित राहील याची काळजी ‘प्रगत’ प्रशासनाकडून घेतली जाते, आपल्याकडे मात्र तशी परिस्थिती नाही. ‘प्रशासनाकडून चुका होणारच’ हे गृहीत धरून नागरिकांनी सतत सतर्क राह्यलं पाहिजे, नाहीतर बेजबाबदार म्हणून आपल्या हक्कांपासून वंचित राहायलाच आपण पात्र ठरू’ हा धडाही मिळाला. सदर स्थितीत, एकाच घरातल्या चार मतदारांपैकी दोघांची नावं वगळली जाणं, वगळलेल्या यादीत ‘मयत’ असा उल्लेख असलेल्या पस्तीशीच्या मतदाराला प्रत्यक्षात मतदान करता येणं, किंवा एकाच व्यक्तीचं नाव तीन मतदारसंघात असणं अशा विविध चुका ‘बेजबाबदार नागरिकां’च्याच पदरी घातल्या जाणार!

शेवटी वैयक्तिक खुलासा –

मी २००४सालीच मुंबई मतदारयादीतून नाव वगळण्यासाठी आवश्यक फॉर्म भरला होता. तरीही यादीमधून माझं नाव आजतागायत काढल नसेल तर त्याला कोण जबाबदार? तसंच माझी पुण्यात दोन घरं असली तरी ती दोन्ही घरं एकाच मतदारसंघात आहेत. शिवाय नियमात अपेक्षित असलेलं माझं ‘सर्वसाधरण वास्तव्याचं स्थान’ कधीच बदललं नव्हतं. (निवडणूक अधिका-यांनी ‘तपास’ करून ‘स्थलांतरीत झाले’ असा ‘अहवाल’ दिला त्याच सुमारास यथायोग्य पोलीस चौकशीनंतर माझ्या पत्नीला तोच पत्ता दर्शवणारा पासपोर्ट दिला गेला.) असं असताना आणि तीन वेळेला याच मतदारसंघातून मी मतदान केले असल्याने, माझे नाव गाळले जाईल असं मी का गृहीत धराव? निवडणूक आयोगाला दिलेल्या माझ्या उत्तरामध्ये हा सगळा खुलासा केलेला आहे आणि न्यायालयाकडे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातही याची यथायोग्य नोंद केलेली आहे.

थोडक्यात, निवडणूक प्रक्रिया आणि त्यासंबंधीच्या कायद्यामध्ये सुधारणा होणे आणि त्यासाठी आपण सगळयांनी प्रयत्न करत राहणे, ही आजची गरज आहे. नाहीतर, म्हातारी मेल्याचं दुःख तर असेलच पण काळही सोकावेल!

- **अमोल पालेकर**